**१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील :-**

**१.१** राज्य शासनाच्या वनसेवेतील राजपत्रित, गट-अ व गट-ब ची पदे.

**१.२** जाहिरात/अधिसूचनेमध्ये भरावयाच्या पदांचा व आरक्षणाबाबतचा तपशील देण्यात येईल. पदसंख्या व आरक्षण शासनाने कळविल्यानुसार राहील व विज्ञापनेत प्रसिध्द केले जाईल.

(१) **नियुक्तीचे ठिकाण :** महाराष्ट्रात कोठेही.

(२) **वेतनबँड व ग्रेड वेतन –**

(एक) **सहायक वनसंरक्षक, गट-अ - रुपये** - ९३००-३४८००,५००० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते.

(दोन) **वनक्षेत्रपाल, गट-ब - रुपये** -९३००-३४८००,४४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते.

(३) **उच्च पदावर बढतीची संधी** - ज्येष्ठता व पात्रतेनुसार महाराष्ट्र वन सेवेतील वरिष्ठ पदावर.

**२. परीक्षेचे टप्पे :-**

**२.१** प्रस्तुत परीक्षा पुढील तीन टप्प्यात घेण्यात येते :- (१) पूर्व परीक्षा - १०० गुण. (२) मुख्य परीक्षा - ४०० गुण. (३) मुलाखत - ५० गुण

**२.२** पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादेत सिमित करण्यासाठी घेण्यात येते. या करीता पूर्व परीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेसाठी पात्र समजण्यात येते.

**२.३** पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जाणारी नाहीत. तसेच, पूर्व परीक्षेचे गुण उमेदवारांना कळविले जाणार नाहीत.

**२.४** मुख्य परीक्षेकरीता आयोगाने विहित केलेले किमान किंवा अधिक गुण मिळविणारे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरतील.

**२.५** जाहिरातीतील तरतुदीनुसार विहित अटींची पूर्तता करणा-या व मुलाखतीच्या वेळी सर्व मूळ कागदपत्रे सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येते.

**३. अर्हता :-**

**३.१ शैक्षणिक अर्हता :-**

**३.१.१ सहायक वनसंरक्षक, गट-अ पदाकरिता -**

(**अ**) खालील विषयांपैकी कमीत कमी एका विषयाची मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी :-

(१) वनस्पतीशास्त्र (२) रसायनशास्त्र (३) वनशास्त्र (४) भूशास्त्र (५) गणित (६) भौतिकशास्त्र (७) सांख्यिकी (८) प्राणिशास्त्र (९)उद्यानविद्या (१०) पशुसंवर्धन व पशुवैद्यकशास्त्र किंवा

(**ब**) कृषि, अभियांत्रिकी, यातील स्नातक पदवीधर

**३.१.२ वनक्षेत्रपाल, गट-ब पदाकरिता-**

(१) वनस्पतीशास्त्र,रसायनशास्त्र, वनशास्त्र, भूशास्त्र, गणित, भौतिकशास्त्र, सांख्यिकी, प्राणिशास्त्र, उद्यानविद्या शास्त्र, कृषी शास्त्र, कृषी अभियांत्रिकी,रसायन अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी, विदयुत अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी, संगणक ॲप्लिकेशन, संगणक विज्ञान, पर्यावरणीय विज्ञान, पशुवैद्यकीय विज्ञान यांपैकी कोणत्याही विषयातील सांविधिक विदयापीठाची विज्ञान शाखेची पदवी किंवा

(२) विज्ञान शाखेव्यतिरिक्त इतर शाखेतील गणित विषयासह पदवीधारक .

(३) विज्ञान शाखेव्यतिरिक्त इतर शाखेतील गणित विषयासह पदवीधारक उमेदवाराने विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**३.२ शारिरीक मानके :-**

**३.२.१** खालीलप्रमाणे शारीरिक पात्रता पूर्ण केलेली असावी :-

(१) अनुसूचित जमाती व्यतिरिक्त अन्य उमेदवार -

| **अ.क्र.** | **पात्रता** | **महिला** | **पुरुष** |
|---|---|---|---|
| १. | उंची | १५० सें.मी.पेक्षा कमी नसावी | १६३ सें.मी. पेक्षा कमी नसावी |
| २. | छाती | -- | (१ ) न फुगवता ७९ सें.मी.पेक्षा कमी नसावी<br>(२) न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी.पेक्षा कमी नसावा. |

(२) अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार –

| **अ.क्र.** | **पात्रता** | **महिला** | **पुरुष** |
|---|---|---|---|
| १. | उंची | १४५ सें.मी.पेक्षा कमी नसावी | १५२.५ सें.मी. पेक्षा कमी नसावी |
| २. | छाती | -- | (१ ) न फुगवता ७९ सें.मी.पेक्षा कमी नसावी<br>(२) न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी.पेक्षा कमी नसावा. |

**३.२.३ दृष्टि** :- सुधारणेनंतर (After Correction) + 4.00 D सह प्रत्येक डोळयाची दृष्टितीक्ष्णता (Visual Acuity) ६/६ असावी. बाह्य डोळयावर कोणतेही रोग संक्रमण झालेले नसावे किंवा तिरळेपणा नसावा.

**३.२.४** पुरुष व महिला उमेदवारांची अनुक्रमे **२५** कि.मी. व **१४** कि.मी. अंतर चार तासांत चालून पूर्ण करण्याची शारिरीक क्षमता असणे आवश्यक.

**३.२.५** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**३.३** अर्जातील माहितीच्या आधारे शारिरीक मोजमापे लक्षात घेवून लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे शारीरिक मोजमाप चाचणीसाठी उमेदवाराचा विचार केला जाईल. विहित शारीरिक मोजमापे अर्जामध्ये आढळून न आल्यास शारीरिक मोजमाप चाचणीसाठी उमेदवारी विचारात घेतली जाणार नाही.

**३.४** प्रस्तुत परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारस झालेल्या उमेदवारांची नियुक्ती करण्यापूर्वी त्यांची शारिरीक मोजमापे व वैद्यकीय चाचणी शासनाच्या संबंधित विभागामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील. वरीलप्रमाणे शारीरिक मोजमापे न भरल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

**३.५** पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**३.६** अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने ही अट मुख्य परीक्षेची माहिती स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यत पूर्ण केली असली पाहिजे.

## ४. शुल्क (फी ) :-

**४.१** प्रस्तुत भरतींकरिता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | रुपये | |
|---|---|---|---|
| | | अमागास | मागासवर्ग |
| (१) | पूर्व परीक्षा | ३७३ | २७३ |
| (२) | मुख्य परीक्षा | ५२३ | ३२३ |

**४.२** वि.जा.(अ),भ.ज.(ब),वि.मा.प्र.,भ.ज.(क),भ.ज.(ड) व इ.मा.व. प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रीमीलेअर) मोडणाऱ्या उमेदवारांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**४.३** उन्नत व प्रगत गटासंदर्भातील (क्रीमी लेअर)उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

**४.४** दिनांक १ जानेवारी, १९६४ ते २५ मार्च, १९७१ या कालावधीत पूर्व पाकिस्तानातून स्थलांतर करुन भारतामध्ये आलेल्या आणि दिनांक १ जून, १९६३ नंतर स्थलांतर करून भारतात आलेल्या मूळचे भारतीय असलेल्या श्रीलंकेतील स्वदेश प्रतावर्ती उमेदवारांनी कोणतेही परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

## ५. पूर्व परीक्षा : -

### ५.१ परीक्षा योजना :-

**(१) प्रश्नपत्रिका :-** एक. प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-

| विषय | संकेतांक | गुण/प्रश्नसंख्या | परीक्षेचा कालावधी | दर्जा | माध्यम | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| मराठी | ०१४ | १००/१०० | एक तास | बारावी | मराठी | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| इंग्रजी | | | | बारावी | इंग्रजी | |
| सामान्य अध्ययन | | | | पदवी | मराठी व इंग्रजी | |

**(२) अभ्यासक्रम :-** सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### ५.२ परीक्षा केंद्र : -

**५.२.१** खालील चार ठिकाणी परीक्षा घेण्यात येते :-

| केंद्र | केंद्राचा संकेतांक | केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|---|---|
| औरंगाबाद | **१५** | नागपूर | **३२** |
| मुंबई | **३०** | पुणे | **३८** |

**५.२.२** विहित पद्धतीने ऑनलाईन माहिती सादर करताना उमेदवाराने केलेल्या मागणीनुसार व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**५.२.३** उपरोक्त परीक्षाकेंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**५.२.४** उपरोक्त परीक्षाकेंद्रांमधून कोणतेही एक केंद्र ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**५.२.५** एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही, तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

५.२.६ एकदा निवडलेल्या केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**५.३ पूर्व परीक्षेचा निकाल : -**

**५.३.१** वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**५.३.२** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी भरावयाच्या एकूण पदाच्या सुमारे ८ पट उमेदवार पात्र होतील, अशा रितीने गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) प्रथम टप्प्यात निश्चित करण्यात येईल. तदनंतर दुस-या टप्प्यात प्रत्येक प्रवर्गातील पदांसाठी १० पट उमेदवार उपलब्ध होतील; अशा रितीने सीमारेषा खाली ओढली जाईल. तथापि, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी दुस-या टप्प्यात पात्र ठरलेले अतिरिक्त उमेदवार केवळ त्यांच्या राखीव प्रवर्गासाठीच्या पदावरच निवडीसाठी पात्र असतील.

**५.३.३** केवळ सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांच्या सीमारेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अंतिम निवडीच्या वेळी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाईल. सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांसाठी असलेली सीमारेषा शिथिल करुन मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेले उमेदवार अंतिम शिफारशीच्या वेळी फक्त संबंधित आरक्षित पदासाठी पात्र ठरतील.

**५.३.४** प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**५.३.५** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर व आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**५.३.६** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल जाहीर झाल्याची बातमी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येईल.

**५.३.७** पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

**६. मुख्य परीक्षा : -**

**६.१ परीक्षेस प्रवेश :-**

**६.१.१** पूर्व परीक्षेकरीता विहित केलेल्या मर्यादेनुसार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**६.१.२** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना वैयक्तिकरित्या ईमेलद्वारे व आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस.द्वारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या ऑनलाईन पद्धतीने परीक्षा केंद्र निवडून परीक्षाशुल्क सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**६.१.३** प्रस्तुत पदाच्या पूर्व परीक्षेसाठी अर्ज करतेवेळी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता नसल्यास व शैक्षणिक अर्हता मुख्य परीक्षेकरिता आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त केल्यास, अशा उमेदवाराला शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल. इतर कोणत्याही दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.

**६.२ परीक्षा योजना :-**

**६.२.१ परीक्षेचे टप्पे** :- दोन. लेखी परीक्षा - ४०० गुण व मुलाखत- ५० गुण.

**६.२.२ प्रश्नपत्रिका :- दोन. प्रत्येक प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे** :-

**६.२.३ प्रश्नपत्रिकेचे स्वरुप** :- प्रस्तुत लेखी परीक्षेमध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे दोन अनिवार्य प्रश्नपत्रिका असतील :-

| पेपर क्रमांक व संकेतांक | गुण | प्रश्नसंख्या | माध्यम | दर्जा | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| १ General Studies (०३७) | २०० | १०० | मराठी व इंग्रजी | पदवी | एक तास | **वस्तुनिष्ठ बहुपर्यायी** |
| २ General Science & Nature Conservation (०३८) | २०० | १०० | इंग्रजी | पदवी | एक तास | **वस्तुनिष्ठ बहुपर्यायी** |

**६.२.४ अभ्यासक्रम :** सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**६.३. परीक्षा केंद्र : -**

**६.३.१** मुख्य परीक्षा खालील चार ठिकाणी घेण्यात येते :-

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| औरंगाबाद | **१५** |
| मुंबई | **३०** |

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| नागपूर | **३२** |
| पुणे | **३८** |

**६.३.२** विहित पद्धतीने ऑनलाईन माहिती सादर करताना उमेदवाराने केलेल्या मागणीनुसार व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**६.३.३** उपरोक्त परीक्षाकेंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**६.३.४** उपरोक्त परीक्षाकेंद्रांमधून कोणतेही एक केंद्र ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**६.३.५** एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

**६.३.६** एकदा निवडलेल्या केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**७. लेखी परीक्षेचा निकाल :-**

**७.१** वस्तुनिष्ठ स्वरुपांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**७.२** भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक आरक्षित प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी २ ते ३ पट उमेदवार मुलाखतीसाठी उपलब्ध होतील, अशा रितीने गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. सदर सीमारेषा सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी तसेच महिला, खेळाडू इत्यादींसाठी वेगवेगळी असेल.

**७.३** प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मुलाखतीसाठी पात्र समजण्यात येईल.

**७.४** प्रस्तुत लेखी परीक्षेमधून शिफारसपात्र होण्याकरिता शतमत (**Percentile**) पध्दत लागू आहे. प्रस्तुत परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणा-या उमेदवारांच्या एकूण गुणांच्या खालीलप्रमाणे किमान गुण प्राप्त करणारे उमेदवार शिफारशीसाठी पात्र असतील :-

**(१) अमागास- किमान ३५ शतमत**

**(२) मागासवर्गीय -किमान ३० शतमत**

**(३) अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू — किमान २० शतमत**

**७.५** लेखी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याची बातमी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येईल.तसेच, मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला ईमेलद्वारे व आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस.द्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.

**७.६** मागास प्रवर्गातील उमेदवार तसेच महिला व पात्र खेळाडू उमेदवार लेखी परीक्षेत केवळ त्यांच्यासाठी विहित केलेल्या निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी केवळ त्या त्या संबंधित प्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल. निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाणार नाही.

**८. पदांचा पसंतीक्रम :-**

**८.१** एकापेक्षा अधिक संवर्गाची पदे भरावयाची असल्यास लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या व जाहिरात / अधिसूचनेत विहित केलेल्या अर्हता, अटी व शर्ती पूर्ण करीत असलेल्या उमेदवारांना संबंधित परीक्षेमधून भरावयाचा पदांचा पसंतीक्रम ऑनलाईन पद्धतीने देणे आवश्यक राहील.

**८.२** पसंतीक्रम नमूद करण्याची फक्त एकच संधी उमेदवारांस खालील अटींवर देण्यात येईल :-

**(१)** पसंतीक्रम ऑनलाईन पद्धतीने आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

**(२)** पसंतीक्रम आयोगास सादर केल्यानंतर पदाच्या पसंतीक्रमात बदल करण्यासंबंधीच्या विनंतीचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

**(३)** आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने पसंतीक्रम सादर न केल्यास अधिसूचनेत नमूद केलेल्या पदक्रमांकानुसारच त्यांचा पसंतीक्रम आहे, असे समजण्यात येईल व त्यात नंतर बदल करण्याची संधी देण्यात येणार नाही.

**९. मुलाखत :-**

**९.१** वरील परिच्छेद क्रमांक ७ नुसार पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल. मुलाखत ५० गुणांची असेल.

**९.२** मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात / अधिसूचनेतील अर्हता / अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

९.३ अर्जातील दाव्यानुसार पात्रतेसंदर्भातील विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

९.४ मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांच्या मुलाखती आयोगाच्या कार्यक्रमानुसार तसेच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व वेळेस घेण्यात येतील.

**१०. अंतिम निकाल :-**

लेखी परीक्षा आणि मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन गुणवत्ताक्रमानुसार यादी तयार करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादीमध्ये समान गुण धारण करणा-या उमेदवारांचा प्राधान्यक्रम (Ranking) "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार ठरविण्यात येईल.

**११. शिफारस :-**

११.१ "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येतील.

११.२ मुलाखत घेतलेल्या उमेदवारांना मुलाखतीनंतर शक्य तितक्या लवकर, त्यांची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेली आहे किंवा नाही ते, कळविण्यात येईल. तसेच शिफारस झालेल्या उमेदवारांची नांवे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

**१२. परिविक्षा कालावधी व प्रशिक्षण :-**

१२.१ सहायक वनसंरक्षक, गट-अ- परिविक्षाधिन कालावधी ३ वर्षाचा असेल, ज्यामध्ये सहायक वन संरक्षकाच्या प्रशिक्षण पाठ्यक्रमाचा २ वर्षाचा कालावधी व प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी निश्चित केल्याप्रमाणे १ वर्ष क्षेत्रीय प्रशिक्षणाचा समावेश असेल.

१२.२ वनक्षेत्रपाल, गट-ब पदाकरिता परिविक्षाधिन कालावधी ३ वर्षाचा असेल. केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या वनशास्त्र प्रशिक्षण महाविदयालयातील दीड वर्ष कालावधीचे प्रशिक्षण तसेच प्रधान मुख्य वन संरक्षक किंवा मुख्य वनसंरक्षक यांनी विहित केलेले दीड वर्षाचे क्षेत्रीय प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणे व विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण करणे आणि परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील.

६.३ विहित प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण न केल्यास किंवा विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण न केल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास किंवा उमेदवार सदर पदासाठी योग्य नसल्याचे आढळून आल्यास तो/ती सेवा समाप्त करण्यास पात्र राहील.

१२.४ विहित प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या सहायक वनसंरक्षक व वनक्षेत्रपालांच्या नियुक्तीची परस्पर जेष्ठता आयोगाने घेतलेल्या परीक्षेत गुणवत्तेच्या आधारे उमेदवाराने मिळवलेले गुण व प्रशिक्षण पाठयक्रमाच्या शेवटी घेण्यात येणा-या अंतिम परीक्षेत मिळविलेले गुण एकत्रित करुन निर्धारित केली जाईल.

१२.५ प्रशिक्षण कालावधीमध्ये शासनाने निश्चित केलेल्या दराने विदयावेतन देण्यात येईल.

**१३. बंधपत्र :-**

१३.१ निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्तीनंतर विहित प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच प्रशिक्षण पूर्ण केल्यावर संबंधित पदावर शासनाने विहित केलेली किमान सेवा पूर्ण करावी लागेल.

१३.२ विहित प्रशिक्षण पूर्ण न केल्यास किंवा विहित किमान कालावधीची सेवा पूर्ण न केल्यास प्रशिक्षणावरील खर्चासाठी शासनाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल इतक्या रकमेची प्रतिपूर्ती करावी लागेल.

१२.३ याबाबतची संबंधित बंधपत्रे उमेदवारास नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहतील.

**१४.** नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

१४.१ हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

१४.२ महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

***********